**निशाणी क्र. ३१ लगत**

**<u>फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र.१ गोपाळ गणपती ढगे यांचा उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ श्रीमती पी. बी. टाकळे यांच्यामार्फत शपथेवर सुरू.</u>**

**१०.** माझे शिक्षण इयत्ता ५ वी पर्यंत झाले आहे. मला लिहिता येते. परंतु फास्ट वाचता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा जांभळवाडीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी डिग्रस येथे राहतो. दोन्ही गावामधील अंतर साधारण ६ किलोमीटर इतके आहे. आरोपीच्या मुलामार्फत माझी आरोपीसोबत ओळख झाली. आरोपीला किती मुले व मुली आहेत, हे मला माहिती नाही. जयपाल विनायक मोमले हा आरोपीचा मुलगा आहे. त्याने माझी आरोपीसोबत ओळख करून दिली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी घरकाम करते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीला जयपाल व अविनाश अशी दोन मुले आहेत. ते दोघेही इंजीनियर आहेत. आरोपीची दोन्ही मुले बाहेर गावी राहतात. आरोपीच्या दोन्ही मुलांना प्रत्येकी दोन ते अडीच लाख रूपये पगार आहे, हे मला माहिती नाही.

**११.** आरोपीची जांभळवाडी येथे ४० ते ५० एकर जमीन आहे, हे मला माहिती नाही. येरोळ गावात आरोपीची ५० ते १०० एकर जमीन आहे, हे मला माहिती नाही. आरोपीचे पती शेती करतात. शेतीतून आरोपीचे वार्षिक उत्पन्न तीस ते चाळीस लाख इतके आहे. आरोपीने माझ्याकडे १,९१,०९४/– रूपये ची मागणी केली. ती रक्कम किती तारखेला मागितली, ती तारीख मला आठवत नाही. आरोपीच्या शिक्षणाबाबत मला काही माहिती नाही. सदर रक्कम मी रोखीने आरोपीस एकाच वेळी दिली आहे. त्या नोटांचा तपशील मला सांगता येणार नाही. रक्कम देतेवेळी आरोपीचा मुलगा व तिचा पती उपस्थित होता. आरोपीने सदर रक्कम सहा महिन्यांत परत करण्याचे आश्वासन दिले होते. रक्कम मागण्यासाठी मी आरोपीकडे गेलो असता आरोपी घरात हजर होती. त्यावेळी आरोपीचा पती घरात उपस्थित होता. आरोपीने मला १,९१,०९४/– रूपयेचा धनादेश दिला. आता मला वादातीत धनादेश दाखविला. त्यावरील मजकूर आरोपीने लिहिला आहे. सदर धनादेशाची तारीख मला आठवत

नाही.

**१२.** सदर धनादेश मी बँकेत वटण्यासाठी जमा केला होता. तो धनादेश जमा केल्याची तारीख मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादातीत धनादेश आरोपीने लिहिला नाही.

प्रश्न– आरोपी तिच्या मुलांसोबत पुण्याला राहत होती?

उत्तर– आरोपी सुरूवातीस मुलांसमवेत राहत होती. परंतु आज रोजी ती गावाकडे राहत आहे.

**१३.** धनादेश हरविल्याबाबत आरोपीने पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती, हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, जांभळवाडी व डिग्रस हे दोन्ही खेडे गाव आहेत. हे म्हणणे खरे नाही की, खेडेगावात व्यवहार केवळ पुरूष पाहतात. आरोपीला मी नोटीस पाठविली होती. ती नोटीस पाठविल्याची तारीख मला आठवत नाही. सदर नोटीस न स्वीकारल्याने मला परत मिळाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला रक्कम दिल्याचे मी खोटे सांगत आहे. डिग्रस गावात माझी चार एकर शेती आहे. त्यातून माझे वार्षीक उत्पन्न एक लाख रूपये आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर उत्पन्न मिळकत असल्याचे मी खोटे सांगत आहे. आरोपीला कोणत्या कारणासाठी रक्कम हवी होती, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी जांभळवाडी येथे केव्हाही राहत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा धनादेश हरविल्याचा गैरफायदा घेवून मी आरोपीविरूद्ध प्रस्तुत खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती

Digitally signed by KRISHNADEO ANKUSH YADAV
Date: 2026.06.30 15:26:24 +0530

उदगीर

**(के. ए. यादव)**

दिनांकः ३०/०६/२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, उदगीर
(न्यायालय क्र.३)